# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९९३


**तात्काळ/कालमर्यादेत**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१८/588

दिनांक :- 06 MAR 2018

**प्रति,**

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती.

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/यवतमाळ/खामगांव/वाशिम/मुर्तिजापूर.

शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापिठासह) व विना अनुदानित संस्थांमधील राजश्री छत्रपती शाहु महाराज प्रतिपुर्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेकरीता प्राप्त अर्जाची तपासणी करण्याबाबत**

**संदर्भ :-**१) मा.उपसचिव, उच्च तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक :- टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि ४ दिनांक ३१ मार्च २०१६.

२) मा.उपसचिव, उच्च तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०१७/प्र.क्र.४०७/तांशि ४ दिनांक २२ फेब्रुवारी २०१८.

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या सोबत जोडलेल्या यादीतील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विदयापीठ) विना-अनुदानित संस्थेमधील आर्थिकदृष्टया मागास वर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या राजश्री छत्रपती शाहु महाराज शिष्यवृत्ती प्रतिपुर्ती योजनेकरीता शैक्षणिक शुल्काच्या ५०% प्रतिपुर्ती रक्कम अदा करण्याकरीता तसेच डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेच्या अमंलबजावणीसाठी ऑनलाईन प्रणालीव्दारे भरलेल्या केन्द्रीयभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक सवर्ष २०१७-१८ मधील लाभार्थी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जाची तपासणी आपल्या संस्था स्थरावर समिती गठीत करुन तपासणी करावयाची आहे.

तेव्हा सोबत जोडलेल्या शासकीय,अशासकीयअनुदनित व विना-अनुदानित संस्थांना आपल्या स्तरावर वेळापत्रक तयार करुन संबंधित संस्थांना सोबत जोडलेल्या संस्थांना दिनांक १०/३/२०१८ चे आत निमंत्रित करुन त्या संस्थेतिल शैक्षणिक संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधिल CAP व्दारे अभियांत्रिकी पदविका व पदवी, औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी तसेच एम.बी.ए. व एम.सी.ए. ईत्यादी अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे ईबीसी अर्जाची आपल्या संस्थेतील जाणकार अधिकारी/कर्मचारी यांची समिती गठीत करुन तपासणी करावी मंजूर अर्जावर संबंधीत तपासणी अधिकारी/कर्मचारी यांचे नांवासह दिनांकीत स्वाक्षरी असावी व ज्या विद्यार्थ्यांचे अर्जात त्रुटी आढळल्यास अशा त्रुटीची पुर्तता आपल्या स्तरावरुन संबंधीत संस्थेला कळवून दिलेल्या वेळेत पुर्ण करुन घ्यावी व त्यानंतरच अर्ज मंजूर करावा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अर्जावर

# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९९३

तपासणी अधिकारी/कर्मचारी यांचे नांव व दिनांकीत स्वाक्षरी असने आवश्यक आहे.तसेच प्रत्येक संस्थेचा विद्यार्थी निहाय अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये ईबीसीचे मुळ अर्जासह सादर करावा.तसेच खाजगी संस्थेतील आर्थिकदृष्टया मागास पात्र विद्यार्थ्यांचे अर्जांची तपासणी करण्याबाबत मार्गदर्शनाकरीता संदर्भीय शासन निर्णय सोबत जोडण्यात येत असून तपासणी समितीस तसे निर्देश देण्यात यावेत. तेव्हा वरील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करुन आपला अहवाल प्रपत्र अ व त्यासोबत विद्यार्थ्यांचे मुळ ईबीसी अर्ज आवश्यक कागदपत्रासह दिनांक १२/३/२०१८ पर्यंत या कार्यालयास हस्तदेय सादर करावे. याबाबत शासन स्तरावर तत्परतेने कार्यवाही सुरु असल्याने सदर कामास प्रथम प्राधान्य देऊन कार्यवाही होणे अपेक्षित आहे. सदर योजनेची रक्कम कोणत्याही परीस्थितीत २५ मार्च २०१८ पर्यंत अदा करणे आवश्यक आहे. जेणे करुन या कार्यालयास वेळेच्या आत पुढील आवश्यक कार्यवाही करणे शक्य होईल तसेच भविष्यात सदर कामात काही अनियमितता आढळल्यास संबंधीतांवर कार्यवाही करण्यात येईल, याची संस्था प्रमुखाने कटाक्षाने नोंद घ्यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(डॉ. डी.व्ही. जाधव)**
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत:-१.प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

२.प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,अनुदानित व विनाअनुदनित अभियांत्रिकी पदविका व पदवी,औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी तसेच एम.बी.ए. व एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था, यांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीनुसार आपल्या संस्थेतील ईबीसी अर्ज आपल्या जिल्हयातील शासकीय संस्थेकडुन तपासणी करावयाचे आहे (यादी सोबत जोडली आहे.) त्यांचेशी त्वरीत संपर्क साधून दिलेल्या मुदतीत अर्जांची तपासणी करुन घ्यावी.तसेच तपासणी अधिकारी/कर्मचारी यांना सादर करुन तपासणी करुन घ्यावी. तसेच तपासणी अधिकारी/कर्मचारी यांनी मागीतलेली आवश्यक कागदपत्रे आपणास दिलेल्या मुदतीत सादर करणे बंधनकारक राहिल जेणे करुन या कार्यालयास मा.तंत्रशिक्षण संचालनायाचे संकेतस्थळावर दिलेल्या मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे अर्ज मंजुर करता येईल जर विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहिल्यास होणा-या नुकसानीस संस्थाप्रमुखास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहीतीकरीता सादर.

संस्थांची यादी

| Sr. No. | Sr. N o | Institute Name |
|---|---|---|
| शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम या संस्थेनी ईबीसी अर्ज तपासावयाच्या संस्था | | |
| **WASHIM DISTRICT** | | |
| ENGINEERING | | |
| 1 | 1180 | Sanmati Engineering College, Sawargaon Barde, Washim |
| 2 | 1267 | Pratap Institute of Management & Technology, Washim |
| POLYTECHNIC | | |
| 3 | 1010 | Govt Polytechnic, Washim |
| 4 | 1180 | Sanmati Engineering College, Sawargaon Barde, Washim |
| DEGREE PHARMACY | | |
| 5 | 1270 | MUP's College of Pharmacy (B. Pharm), Degaon Tq. Risod Dist. Washim |
| DIPLOMA PHARMACY | | |
| 6 | 1270 | MUP's College of Pharmacy (B. Pharm), Degaon Tq. Risod Dist. Washim |
| 7 | 1281 | Kamalprakash Pharmacy college and Research Center, Kherda |
| 8 | 1264 | Vidarbha Institute of Pharmacy, Washim |
| | | |
| | | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापुर या संस्थेनी ईबीसी अर्ज तपासावयाच्या संस्था |
| **AKOLA DISTRICT** | | |
| **ENGINEERING** | | |
| 1 | 1116 | Shri Shivaji Education Society's College of Engineering and Technology, Akola |
| 2 | 1251 | Bhonsla College of Engineering & Reasearch, Akola |
| 3 | 1276 | Mavav School of Engineering & Technology, Gut No. 1035 Nagpur Surat Highway, NH No. 6 Tal.Vyala, Balapur, Akola, 444302 |
| **POLYTECHNIC** | | |
| | 1003 | Govt polytechnic, Murtizapur |
| 4 | 1138 | Saraswati Education Society's Shree Tirupati Tantra Niketan, Akola |
| 5 | 1245 | Sakshi Shikshan Krida Prasarak & Bahu Sanstha's Dr. Rajesh Ramdasji Kambe Polytechnic, Turkhed, Tal: Murtizapur Dist: Akola |
| 6 | 1249 | Bhonslas Education Trust's Bhonsla Polytechnic, Akola- Washim Highway, Tah. & Dist. Akola |
| 7 | 1275 | Manav School of Polytechnic, Vyala, Tal.Balapur, Akola |
| **DEGREE PHARMACY** | | |
| 8 | 1135 | Shri Gurudatta Shikshan Prasarak Sanstha's Institute of Pharmacy, Kaulkhad, Akola |
| **DIPLOMA PHARMACY** | | |
| 9 | 1014 | Gitadevi Institute of Pharmacy, Akola |
| 10 | 1167 | Shri Gurudatta Shikshan Prasarak Sanstha's Late Shri Ramraoji Gawande Institute Of Pharmacy, Akola |
| शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव या संस्थेनी ईबीसी अर्ज तपासावयाच्या संस्था | | |
| **BULDHANA DISTRICT** | | |
| ENGINEERING college | | |
| 1 | 1101 | 1101 - Shri Sant Gajanan Maharaj College of Engineering,Shegaon |
| 2 | 1119 | 1119 - Paramhansa Ramkrishna Maunibaba Shikshan Santha's , Anuradha Engineering College, Chikhali |

| | | |
|---|---|---|
| 3 | 1125 | Dwarka Bahu Uddeshiya Gramin Vikas Foundation, Rajarshri Shahu College of Engineering, Buldhana |
| 4 | 1130 | Vision Buldhana Educational & Welfare Society's Pankaj Laddhad Institute of Technology & Management Studies, Yelgaon |
| 5 | 1182 | Padmashri Dr. V.B. Kolte College of Engineering, Malkapur, Buldhana |
| 6 | 1265 | Mauli Group of Institutions, College of Engineering and Technology, Shegaon. |
| 7 | 1268 | Siddhivinayak Technical Campus, School of Engineering & Research Technology, Shirasgon, Nile |
| | | POLYTECHNIC |
| 8 | 1009 | Govt polytechnic, Khamgaon |
| 9 | 1147 | Rambhauji Lingade Polytechnic College, Buldhana |
| 10 | 1153 | Adarsha Bahuuddeshiya Shikshan Prasarak Mandal, Dr. R. N. Lahoti Polytechnic, Sultanpur |
| 11 | 1182 | Padmashri Dr. V.B. Kolte College of Engineering, Malkapur, Buldhana |
| 12 | 1244 | Bhiwsan Patil Shinde Shikshan Gramin Vikas & Bahu Sanstha,Shinde Polytechnic, Anjani Bk Tal: Mehkar, Dist: Buldhana |
| 13 | 1250 | Paramhans Ramkrishna Mouni Baba Shikshan Sanstha's Anuradha Polytechnic, Anuradha Nagar,Chikhali, Buldhana |
| 14 | 1268 | Siddhivinayak Technical Campus, School of Engineering & Research Technology, Shirasgon, Nile |
| 15 | 1269 | Rajarshi Shahu Polytechnic, Buldhana. |
| | | DEGREE PHARMACY |
| 16 | 1133 | Anuradha College Of Pharmacy, Chikhli |
| 17 | 1136 | Indira Bahuuddeshiy Shikshan Sanstha's College of Pharmacy,Malkapur |
| 18 | 1280 | Gawande College Of Pharmacy, Sakharkheda Tq. Chikhali Dist Buldhana |
| 19 | 1282 | Pankaj Laddad college of Pharmacy, Buldana |
| 20 | 1271 | Rajashri Sahhu College of Pharmacy, Buldhana. |
| | | DIPLOMA PHARMACY |
| 21 | 1133 | Anuradha College Of Pharmacy, Chikhli |
| 22 | 1136 | Indira Bahuuddeshiy Shikshan Sanstha's College of Pharmacy,Malkapur |
| 23 | 1158 | Anuradha College Of Pharmacy, Chikhli |
| 24 | 1161 | Matoshri Education Soc of Pharmacy, Mehkar |
| 25 | 1165 | Rajshri shahu college of Pharmacy, Buldana |
| 26 | 1271 | Rajashri Sahhu College of Pharmacy, Buldhana. |
| 27 | 1279 | R N Lahoti College Of Pharmacy, Sultanpur Dist Buldhana |
| 28 | 1285 | MES College of Pharmacy, Mehkar |
| 29 | 1280 | Gawande College Of Pharmacy, Sakharkheda Tq. Chikhali Dist Buldhana |
| | | M.B.A. |
| 30 | 1101 | Shri Sant Gajanan Maharaj College of Engineering,Shegaon |
| | | M.C.A. |
| 31 | 1113 | 1113 - Sadhana Shikshan Mandal, Saraswati College, Shegaon |

## शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ या संस्थेनी ईबीसी अर्ज तपासावयाच्या संस्था

## YAVATMAL DISTRICT

| Sr. No. | Institute Code | Institute Name |
|---|---|---|
| | | **ENGINEERING** |
| 1 | 1117 | Janata Shikshan Prasarak Mandal's Babasaheb Naik College Of Engineering, Pusad |
| 2 | 1120 | Jawaharlal Darda Institute of Engineering and Technology, Yavatmal |
| 3 | 1122 | Dr. Bhausaheb Nadurkar College of Engineering, Waghapur,Yavatmal |
| 4 | 1127 | Jagadambha Bahuuddeshiya Gramin Vikas Sanstha's Jagdambha College of Engineering and Technology, Yavatmal |

| | | |
|---|---|---|
| | | **POLYTECHNIC** |
| 5 | 1012 | Govt Polytechnic, Yavatmal |
| 6 | 1011 | Govt Residential women Polytechnic, Yavatmal |
| 7 | 1141 | Janata Shikshan Prasarak Mandal's Dr.N.P.Hirani Polytechnic, Pusad |
| 8 | 1150 | Swavalambi Shikshan Sanstha's Sushganga Polytechnic, Wani |
| 9 | 1151 | Late Ahilyabai Kakade Bahuuddeshiya Shikshan Prasarak Mandal. Sai Polytechnic.Kinhi(J),Yavatmal |
| 10 | 1152 | Vidarbha Rural Reconstruction Foundation's. Rajeshkumar Wadhawan Polytechnic Institute. Yavatmal |
| 11 | 1168 | Balaji Polytechnic,Sawarala.Tal-Wani,Yavatmal |
| | | **DEGREE PHARMACY** |
| 12 | 1115 | J.S.P Mandal's Sudhakarrao Naik Institute of Pharmacy, Pusad Dist. Yavatmal |
| 13 | 1134 | Yavatmal Zilla Vikas Samitee's Pataldhamal Wadhwani College of Pharmacy. Yavatmal |
| | | **शासकीय निवासी महीला तंत्रनिकेतन, यवतमाळ या संस्थेनी ईबीसी अर्ज तपासावयाच्या संस्था** |
| | | **DIPLOMA PHARMACY** |
| 1 | 1155 | Shikshan Prsarak Mandal's Institute of Pharmacy, Wani |
| 2 | 1156 | Janata Shikshan Prasarak Mandal's Sudhakarrao Naik Institute Of Pharmacy. Pusad |
| 3 | 1157 | Shri Chhatrapati Shahumaharaj Shikshan Santha's Institute Of Pharmacy, Maregaon |
| 4 | 1159 | Navsanjivan Shikshan Mandal's College of Pharmacy. Dharwa |
| 5 | 1160 | Shri.Durgamata Bahuudeshiya Krida and Shaikshanik Sanstha,Ishwar Deshmukh Institute Of Pharmacy. Digras |
| 6 | 1162 | Sanjay Rathod Shikshan Sanstha's Manohar Naik Institute of Pharmacy,Umarkhed |
| 7 | 1171 | Pataldhamal Wadhwani College of Pharmacy, Yavatmal |
| | | **M.B.A.** |
| 8 | 1106 | 1106 - Hari Kishan Jaju Education Sanstha's,College of Management & Computer Science, Yavatmal |
| | | **M.C.A.** |
| 9 | 1110 | 1110- Dr.Babasaheb Nandurkar College of Physical Education , Yavatmal |

## AMRAVATI DISTRICT

### शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती या संस्थेनी ईबीसी अर्ज तपासावयाच्या संस्था

| Sr. No. | Institute Code | Institute Name |
|---|---|---|
| | | **ENGINEERING** |
| 1 | 1002 | Govt college of Engg, Amravati |
| 2 | 1107 | 1107- P. R. Pote (Patil) Education & Welfare Trust's Group of Institution(Integrated Campus), Amravati |
| 3 | 1105 | 1105 - Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati |
| 4 | 1108 | 1108 - Maratha Shikshan Sanstha, P.R. Patil College of Engineering & Technology. Amravati |
| 5 | 1114 | Sipna Shikshan Prasarak Mandal College of Engineering & Technology. Amravati |
| 6 | 1121 | Shri Hanuman Vyayam Prasarak Mandals College of Engineering & Technology, Amravati |
| 7 | 1123 | Indira Bahuuddeshiya Shikshan Sanstha, College of Engineering, Ghatkheda, Amravati |
| 8 | 1124 | G.H. Raisoni college of Engineering & Management, Amravati |
| 9 | 1126 | Shri. Dadasaheb Gawai Charitable Trust's Dr. Smt. Kamaltai Gawai Institute of Engineering & Technology, Darapur, Amravati |

| | | |
|---|---|---|
| 10 | 1128 | Vidarbha Youth Welfare Society's, Prof Ram Meghe College of Engineering and Management, Badnera |
| 11 | 1129 | Dhamangaon Education Society's College of Engineering and Technology, Dhamangaon |

## शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती या संस्थेनी ईबीसी अर्ज तपासावयाच्या संस्था

### POLYTECHNIC

| | | |
|---|---|---|
| 1 | 1008 | Govt polytechnic, Amravati |
| 2 | 1007 | Shree Shivaji Education Society's Dr. Panjabrao Deshmukh Polytechnic, Amravati |
| 3 | 1139 | Shree Shivaji Education Society's Dr. Panjabrao Deshmukh Girls Polytechnic, Amravati |
| 4 | 1140 | Dhamangaon Education Society's L.A.M.I.T. Dhamangaon Rly. Amravati |
| 5 | 1142 | Vidarbha Youth Welfare Society's Polytechnic, Badnera, Amravati |
| 6 | 1015 | Govt Polytechnic, Achalpur |
| 7 | 1144 | Bhausaheb Javade Education Society, Amravati Polytechnic College, Bhankhed, Amravati |
| 8 | 1146 | Chaitanya Bahuuddeshiya Sanstha's, G. H. Raisoni Polytechnic, Mhasla, Anjangaon, Amravati |
| 9 | 1148 | P.R. Pote (Patil) Education & Welfare Trust, P. R. Pote Institute Of Polytechnic & Technology, Amravati |
| 10 | 1246 | Indira Bahuuddeshiya Shikshan Sanstha's Dr. Rajendra Gode Polytechnic,Ghatkhed, Amravati |
| 11 | 1247 | Shri Dadasaheb Gavai Charitable Trust's Vikramshila Polytechnic,Darapur, Tal. Daryapur, Dist. Amravati |
| 12 | 1277 | Kirti Polytechnic Amravati |

## शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती या स्स्थेनी ईबीसी अर्ज तपासावयाच्या संस्था

### DEGREE PHARMACY

| | | |
|---|---|---|
| 1 | 1003 | Govt college of Pharmacy, Amravati |
| 2 | 1005 | Sant Gadgebaba amravati Vidyapith, Amravati |
| 3 | 1131 | Vidya Bharati College of Pharmacy, Amravati |
| 4 | 1283 | P.R. Pote (Patil) Education & Welfare Trust, P. R. Pote Institute Of Pharmacy, Amravati |
| 5 | 1284 | Dr. Rajendra Gode college of Pharmacy, Amravati |

### DIPLOMA PHARMACY

| | | |
|---|---|---|
| 6 | 1131 | Vidya Bharati College of Pharmacy, Amravati |
| 7 | 1164 | Shri Swami Samarth institute of Pharmacy, Parsodi |
| 8 | 1283 | P.R. Pote (Patil) Education & Welfare Trust, P. R. Pote Institute Of Pharmacy, Amravati |
| 9 | 1284 | Dr. Rajendra Gode college of Pharmacy, Amravati |
| 10 | 1286 | Institute of Pharmacy & Reserch, Badnera |

### M.B.A.

| | | |
|---|---|---|
| 11 | 1102 | 1102- Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati |
| 12 | 1105 | Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati |
| 13 | 1107 | P. R. Pote (Patil) Education & Welfare Trust's Group of Institution(Integrated Campus), Amravati |
| 14 | 1108 | Maratha Shikshan Sanstha, P.R. Patil College of Engineering & Technology, Amravati |
| 15 | 1109 | 1109 G.H. Raisoni Institute of Management Studies, Anjangaon, Bari Road,Amravati |
| 16 | 1114 | Sipna Shikshan Prasarak Mandal College of Engineering & Technology, Amravati |

| | | |
|---|---|---|
| 17 | 1121 | Shri Hanuman Vyayam Prasarak Mandals College of Engineering & Technology, Amravati |
| **M.C.A.** | | |
| 18 | 1102 | Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati |
| 19 | 1105 | Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati |
| 20 | 1107 | P. R. Pote (Patil) Education & Welfare Trust's Group of Institution(Integrated Campus), Amravati |
| 21 | 1111 | 1111 - Shree Hanuman Vyayam Prasark Mandal's P.G. Department of Computer Science & Technology, Amravati |
| 22 | 1266 | Harikisan Maloo Institute Of Management & Technology, Amravati |

**सहसंचालक तंत्रशिक्षण**

अमरावती

प्रपत्र अ

# आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी करावयाची चेकलिस्ट

खालील प्रमाणे कागदपत्रे जोडले असल्यास अशी खुण करावी नसल्यास × अशी खुण करावी.

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नांव | कॅप अलॉटमेन्ट लेटर | तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला (उत्पन्नाचा दाखला आहे किंवा नाही) नमूद करावे | अधिवास प्रमाणपत्र | मागील वर्षी परीक्षा उत्तीर्ण / एटीकेटी गुणपत्रिका | अपत्य / बावनचा पुरावा रेशनकार्ड प्रत | गॅप अभ्यास गॅप ॲफीडेव्हिट | वडील हयात नसल्यास मृत्यु दाखला | आधार कार्ड | बँक पासबुक | चालू शैक्षणिक वर्षास प्रवेश घेतल्याची फी पावती | डिप्लोमा (तंत्रनिकेतन) विद्यार्थ्याने ११ वी, १२ वी नंतर प्रवेश घेतला असेल / तसेच अभियांत्रिकी /औषधनिर्माण पदवी करीता प्रवेशीत विद्यार्थ्यांनो बीएड, लॅपटॉप, वगैरेसाठी असेल तर संबंधीत महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांस कोणतीही शिष्यवृत्ती अथवा सवलत घेतली किंवा नाही प्रमाणपत्र | विद्यार्थ्याने हिवाळी व उन्हाळी २०१६ मध्ये परीक्षा अर्ज भरला किंवा नाही. तपासावे. | विद्यार्थ्यांचे सहा महिन्याचे पट पडताळणी सदर केले किंवा नाही व परीक्षेस बसण्यास पात्र आहे किंवा नाही पट पडताळणी प्रमाणपत्र तपासावे. | विद्यार्थ्याचे विद्यापिठाने नामांकन केले किंवा नाही. तपासावे. | अर्ज मंजूर अथवा नामंजूर असल्यास तसे नमूद करावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

तपासणी समिती अध्यक्षाचे नांव

स्वाक्षरी

तपासणी समिती सदस्य सचिवाचे तपासणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नांव

स्वाक्षरी स्वाक्षरी

खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. टीईएम -२०१५/प्र.क्र. २१९/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३१ मार्च, २०१६.

**वाचा :** १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम -२०१४/ प्र. क्र. ९०/तांशि-४, दिनांक २०.०३.२०१५.

**प्रस्तावना :**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खाजगी कायम विना अनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या सामाजिक मागास व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी केवळ निधीअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नये म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून, राज्य शासनाने फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेतलेला आहे. सदरहू निर्णय शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सुरु ठेवण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने दिनांक १७.०३.२०१६ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये खालील सुधारणांसह मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे :-

१. मंत्रिमंडळ टिप्पणीतील परिच्छेद क्र. १४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात यावी.

२. सदर योजनेच्या अंमलबजावणीस दरवर्षी मंत्रिमंडळाची मान्यता न घेता धोरण म्हणून सदर योजनेस मान्यता देण्यात यावी.

३. तथापि, सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सुधारीत पद्धतीचा पुढील शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी विभागाने सविस्तर आढावा घ्यावा.

४. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असलेला निधी सर्व संबंधित विभागांना प्रत्येक वित्तीय वर्षी अर्थसंकल्पीत करुन उपलब्ध करण्यास मान्यता असावी.

५. सदर योजनेचे मूळ निकष न बदलता अंमलबजावणीत सुधारणा करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना वित्त विभागाच्या सल्ल्याने प्रदान करण्यास मान्यता देण्यात यावी.

(२ ) सदरहू योजनेचा लाभ घेण्यासाठी आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १.०० लक्ष किंवा त्या रकमेच्या आत असणे आवश्यक राहील.

(३) आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना निर्धारीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल.

(४) सदरहू योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पूर्वी वा चालू शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या पूर्ण कालावधीपर्यंत या आदेशातील अटी शर्तीनुसार लागू राहील.

(५) तंत्र शिक्षणाशीं निगडीत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे, असे विद्यार्थी या योजनेअंतर्गत लाभास पात्र असतील.

(६) सदरहू योजनेचा लाभ एआयईईई कोट्यांतून प्रवेश घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांनाही लागू राहील.

(७) सदर योजना ही खाजगी अभिमत विद्यापीठ अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

(८) सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने निश्चित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणा-या विदयार्थ्यांसाठीच मर्यादित राहील.

(९) शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ काणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. म्हणजेच अन्य योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ घेत असल्यास तो विद्यार्थी या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असणार नाही.

(१०) लाभार्थी विद्यार्थ्याने नियमितपणे महाविद्यालय / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहील व प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहील. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे संबंधित विदयार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधीत उपसंचालक / सहसंचालक वा सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

(११) पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतल्यानंतर एखादंया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर विद्यार्थी या योजनेचा लाभ मिळण्यास अपात्र राहील.

तथापि, तद्नंतर पुनश्च: त्या सत्र/वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेच्या लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

(१२) परंतु असे पात्र लाभार्थी विदयार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश

**शुल्क प्रतिपूर्तीच्या वितरणाची कार्यपद्धती:-**

(१९) सदर. योजनेची अंमलबजावणी करणा-या प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या शैक्षणिक संस्थांमधील व्याबसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या पात्र लाभार्थींचे अर्ज स्विकारण्यासाठी संगणकीय ऑनलाईन प्रणाली निर्माण करावी. सदर प्रणाली निर्माण करुन आवश्यकतेनुरुप संबंधित विद्यापीठाशी जोडून त्याद्वारे संबंधित पात्र लाभार्थ्यांनी परीक्षा दिली आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठीची सोय करण्यात यावी. याकरीता सर्व संबंधित विद्यापीठाकडून सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांच्या संगणक प्रणालीशी जोडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य करणे अनिवार्य असेल.

(२०) प्रत्येक प्रवर्गातील अर्जदार विद्यार्थ्याकरिता निश्चित केलेल्या त्याच्या कुटुंबाची (दोन्ही पालकांची एकत्र) उत्पन्न मर्यादा ही सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केल्याची खातरजमा करणे आवश्यक असून आर्थिक मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार यांचे असावे.

(२१) प्रत्येक लाभार्थी विदयार्थ्याचा आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांक नमूद करुन संबंधित विद्यार्थी प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खातरजमा करुन त्या विदयार्थ्याची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑनलाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑनलाईन अर्ज सक्षम अधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहिल.

(२२) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी.करणे आवश्यक असेल.

(२३) सक्षम प्राधिका-यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विदयार्थ्याची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरणाद्वारे वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

(२४) पात्र विद्यार्थ्यांची माहिती आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांकाशी संबंधित संचालनालय/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांचेकडील अथवा अन्य उपलब्ध व्यक्तिगत माहितीशी संलग्नीत झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राच्या-परीक्षेस बसला असेल अशा व केवळ उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तींची पूर्तता करत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनाच सदर योजनेतील लाभासाठी पात्र समजण्यात येईल.

(२५) ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरण व संबंधित विद्यापीठाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठाच्या पटावर नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या पात्र विद्यार्थ्याला व सहा महिन्याचे पट पडताळून त्याला प्रमाणपत्र दिल्यावर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. संस्थेने खोटे प्रमाणपत्र दिल्यास संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना ५० टक्के फी माफी (२२०३०७४८), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. २०२/व्यय-५, दिनांक २९.०३.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३३११०५६४४७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr. Kiran N Patil

(डॉ. किरण पाटील)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव, (कृषि) कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) आयुक्त, सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई.
११) सचिव, प्रवेश व शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) आयुक्त, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१९) संचालक, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) कुलगुरु, सर्व विद्यापीठे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EBC) ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांसाठी डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय: संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४०७/तांशि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-२२ फेब्रुवारी, २०१८

**वाचा :** १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५ एप्रिल, २०१७
३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक २१ जून, २०१७
४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७
५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७
६) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७ ऑक्टोबर,२०१७
७) शासन शुध्दिपत्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७
८) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीबीसी-१०/२०१७/ प्र.क्र.१९६/मावक, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७

**प्रस्तावना :-**

राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनु दानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या निवडक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु.६.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना शासनाने संदर्भ क्र. १ येथील दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये राजर्षी

छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु केली आहे. तसेच सदरच्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांना वसतिगृहाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करण्यास व्यत्यय येऊ नये यासाठी शासनाने संदर्भ क्र. १ येथील दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना देखील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून कार्यान्वित केली आहे.

२. याशिवाय दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयाव्दारे ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प भूधारक शेतकरी/ नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये १.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रचलित व नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसह बिगर व्यावसायिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी/ १२ वी) अभ्यासक्रमांसाठी काही निश्चित दराने निर्वाहभत्ता अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

३. मराठा आरक्षणासंदर्भात मा.मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ३१/१०/२०१७ व दिनांक ०७/११/२०१७ रोजी आयोजित बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन रुपये ६.०० लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (अल्पभूधारक शेतकरी/नोंदणीकृत मजूर वगळून ) वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारील योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे ( दोन्ही पालकांचे एकत्रित ) वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाखापर्यंत आहे, अशा विद्यार्थ्यांकरीता डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता विस्तारीत योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र प्रतिविद्यार्थी प्रतिवर्ष शहरी भागांसाठी (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी) रुपये १०.०००/- व इतर शहरे / ग्रामीण भागासाठी रुपये ८०००/- याप्रमाणे निर्वाहभत्त्याची रक्कम विद्यार्थ्यांना देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा,१९५० व संस्था नोंदणी कायदा,१८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था वसतिगृह चालविण्यासाठी तयार असल्यास त्या संस्थेलादेखील याच दराने निर्वाहभत्ता विद्यार्थ्यांमार्फत देण्यात यावा.

२. या वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील:-

१) ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ( दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ६.०० लाखापर्यंत आहे अशा केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता गुणवत्तेनुसार प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह निर्वाहभत्ता योजना लागू करण्यात यावी .

२) हे व्यावसायिक अभ्यासक्रम प्रचलित तसेच संदर्भ क्र.६) वरील दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवस्थापन कोटयामध्ये अथवा खाजगी अभिमत विद्यापीठामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता ही निर्वाहभत्ता योजना अनुज्ञेय राहणार नाही.

३) या योजनेंतर्गत महानगरासाठी (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी) व इतर शहरे / ग्रामीण भागासाठी प्रति विद्यार्थी प्रति वर्षी अनुक्रमे रुपये १०,०००/- व रुपये ८,०००/- इतका निर्वाह भत्ता देण्यात यावा.

४) या योजनेंतर्गत रुपये १.०० लाखपर्यंत उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाहभत्त्याचा लाभ देण्याकरीता संख्येची कोणतीही मर्यादा असणार नाही. मात्र रुपये १.०० लाख ते रुपये ६.०० लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक जिल्ह्यासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांची कमाल संख्या ५०० इतकी निश्चित करण्यात येत आहे. त्यापैकी ३३% इतक्या जागा विद्यार्थिनीकरीता राखीव ठेवण्यात याव्यात. पुरेशा विद्यार्थिनी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहणाऱ्या जागा त्याच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरीता उपयोगात आणण्यात याव्यात.

५) प्रत्येक जिल्ह्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाचा कोटा हा प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या संख्येनुसार प्रमाणशीररित्या (Proportionate) निश्चित करण्यात यावा .

६) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या कालावधीकरीताच निर्वाहभत्ता देण्यात यावा . एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास अथवा काही कारणांमुळे त्याला वरच्या वर्गात प्रवेश न मिळाल्यास त्यास त्या वर्षापुरता निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

७) सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल.

८) एखाद्या विद्यार्थ्याने सामान्य रहिवासी असलेल्या त्याच्या गावातील शहरातील संस्थेमध्ये / व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यास त्यास निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

९) एखाद्या विद्यार्थ्याने शासकीय/ निमशासकीय/ खाजगी वसतिगृहामध्ये प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यार्थ्याने त्याबाबतचा योग्य तो पुरावा सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक करण्यात यावे. खाजगी मालकीच्या घरामध्ये विद्यार्थ्याने स्वत:ची राहण्याची सोय केली असल्यास अशा विद्यार्थ्यास नोंदणीकृत अथवा नोटराईज्ड भाडे कराराची प्रत सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक राहिल.

१०) एखाद्या विद्यार्थ्यास अन्य कोणत्याही योजनेखाली निर्वाह भत्ता मिळत असल्यास असा विद्यार्थी या योजनेखाली लाभ मिळण्यास अपात्र राहील.

११) या योजनेंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी इतर अटी व शर्ती तसेच निर्वाह भत्त्याच्या वितरणाची कार्यपध्दती शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/ तांशि-४, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये विहित केल्याप्रमाणे राहील.

१२) बनावट विद्यार्थ्याची नोंद घेऊन आर्थिक लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत विद्यार्थी / महाविद्यालय / संस्था यांच्याविरुध्द संबंधीत विभागीय सहसंचालकांनी फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी.

१३) विद्यार्थ्याची महाविद्यालयातील लगतपूर्वीच्या सत्रातील आधारसंलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीव्दारे नोंदविलेली किमान ५० टक्के इतकी उपस्थिती व विद्यार्थी लगतपूर्वीच्या सत्र परीक्षेत बसला असल्याची खात्री करण्यात यावी.

३. मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा,१९५० व संस्था नोंदणी कायदा,१८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था वसतिगृह चालविण्यासाठी तयार असल्यास सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता वसतिगृहाची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे अटी निर्धारित करण्यात येत आहेत :-

१) अशी संस्था ही मुंबई विश्वस्त कायदा,१९५० किंवा संस्था नोंदणी कायदा,१८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था या कायद्याखाली नोंदणीकृत असावी.

२) एका पेक्षा अनेक संस्थांची मागणी आल्यास अनुभवी व जास्त सुविधा असणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात यावे.

३) अशा संस्थेचे किमान ३ वर्षे लेखापरिक्षण परिपूर्ण असणे आवश्यक आहे.

४) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी मध्यवर्ती असणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात यावे.

५) संबंधीत संस्थांनी या प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव दाखल करावा. जिल्हयाधिकाऱ्यांनी छाननी करुन प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय यांच्याकडे पाठवावा व विभागीय सहसंचालकांनी तपासणी करुन एकत्रित प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडे पाठवावा. संचालक, तंत्र शिक्षण यांनी विहित अटी व निकष तपासून संस्थेची निवड करावी.